धुळे महानगरपालिका कार्यालय, धुळे
जा.क्र धुमपा/आस्था/२९००/२०२०
दिनांक-१/१०/२०२०

**धुळे महानगरपालिकेत शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत विविध पदे भरतीबाबत**

धुळे महानगरपालिकेत विविध विभागासाठी शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत एक वर्षाकरिता खालील प्रमाणे पदनिहाय शिकाऊ उमेदवारांची भरती करावयाचे असुन पात्र व इच्छुक उमेदवारांनी www.Apprenticeshipindia.org या पोर्टलवर स्वताचे रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. तसेच रजिस्ट्रेशन झाल्याबाबत पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या व आरक्षण | पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | फिटर | १०<br>खुला ९<br>अ.जा. १ | आय.टी. आय कोर्स उतीर्ण |
| २ | इलेक्ट्रीशीयन | १०<br>खुला ९<br>अ.जा. १ | आय.टी. आय कोर्स उतीर्ण |
| ३ | प्लंबर | २०<br>खुला १७<br>अ.जा. ०२<br>अ.ज ०१ | आय.टी. आय कोर्स उतीर्ण |
| ४ | पंप ऑपरेटर | १५<br>खुला १३<br>अ.जा. ०१<br>अ.ज ०१ | आय.टी. आय कोर्स उतीर्ण |
| ५ | Computer Op. & Prog.Asst. | १५<br>खुला १३<br>अ.जा. ०१<br>अ.ज ०१ | आय.टी. आय कोर्स उतीर्ण |
| ६ | Gen.Duty Assitant - Advanced वर्ग - ४ | २०<br>खुला १७<br>अ.जा. ०२<br>अ.ज ०१ | १० वी पास |
| ७ | Assitant (Human Resource सहाय्यक | २०<br>खुला १७<br>अ.जा. ०२<br>अ.ज ०१ | कोणत्याही विगर अभियांत्रिकी शाखेचा पदवीधर (मराठी ३० व इंग्रजी ४० परीक्षा उतीर्ण असणे आवश्यक) |

**- सर्वसाधारण अटी व शर्ती -**

१ सदर नेमणुक १ वर्षाकरिता कालावधीसाठी असेल.
२ वयोमर्यादा सर्वसाधारण उमेदवाराकरीता ३८ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ४२ वर्ष राहिल.
३ पात्र उमेदवारानी सोबत दिलेल्या विहित नमुन्यात दि. १६/१०/२०२० पावेतो अर्ज सादर करावेत.
४ नेमणुक कालावधी संपण्यापुर्वी नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार मा आयुक्त सो मनपा धुळे यांनी राखुन ठेवलेला आहे.
५ अर्जासोबत वर नमुद केलेल्या नोंदणी पत्राची प्रत, शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित / सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे व उमेदवाराचे आपला पत्ता ठळक अक्षरात नाव, तालुका, जिल्हा इत्यादी घरचा दुरध्वनी क्रमांक/ भ्रमणध्वनी क्रमांक स्वत:च्या हस्ताक्षरात अर्जात नमुद करणे आवश्यक राहिल.
६ अ.क्र ६ व अ.क्र. ७ मध्ये उमेदवाराची निवड झाल्यानंतर पुर्वचारित्र्याचा दाखला पोलीस अधिक्षकांकडुन (संबंधीत) प्राप्त करुन विभागात एक महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहिल.
७ जाहिरातीप्रमाणे भरती प्रक्रिया स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार मा आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांनी राखुन ठेवलेले आहेत.
८ निवड प्रक्रियेमध्ये उमेदवार निवडीचे सर्व अधिकार मा.आयुक्त मनपा धुळे यांनी राखुन ठेवलेले आहेत.
९ सोबत अर्जाचा नमुना
१० सदर पदसंख्या कमी जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा आयुक्त सो यांच्या मान्यतेने)

(गणेश गिरी)
उपायुक्त
धुळे महानगरपालिका धुळे.